
हेरॉल्डची परी कथा


लेखक: क्रॉकेट जॉन्सन

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन







एकदा संध्याकाळी हेरॉल्ड पलंगावरून उठला.
आपला जांभळा खडू आणि चंद्र सोबत घेऊन तो
एका सुंदर बागेत फेरफटका मारायला निघाला.



बागेत काहीही उगवलं नव्हतं. ती बाग कधीकाळी खूप सुंदर होती, हे माहीत नसतं तर हेरॉल्डला ती जागा ओसाड वाटली असती.




बागेची अवस्था अशी का झाली, हे राजाला विचारायचं असं हेरॉल्डने ठरवलं.




राजेलोक मोठ्या महालांमध्ये राहात असत. महाल राजाला सुयोग्य असा मोठा असेल, याची हेरॉल्डने काळजी घेतली.

कुणा राजपुत्राशी, सरदाराशी वा मंत्र्याशी चर्चा करून हेरॉल्डला वेळ दवडायचा नव्हता.




राजाचा महाल झाला एकदाचा. त्यात उंच उंच मनोरे होते. महालाला एक मोठं प्रवेशद्वार होतं, राजाला पसंत नसणाऱ्या लोकांना दूर ठेवण्यासाठी.

पण प्रवेशद्वार काढून पूर्ण झालं तेव्हा त्याने हेरॉल्डलासुद्धा बाहेर ठेवलं.




हेरॉल्डने खूप आरडाओरडा केला.
पण प्रवेशद्वार उघडलं नाही.


तो सुंदर बागेच्या काठावरून चालू
लागला. मग त्याला त्याच्या
जांभळ्या खडूची आठवण झाली.



उंदरापेक्षा लहान असलेला प्राणी
महालाच्या आत जाऊ शकेल.




हेरॉल्ड न झुकता एका
छोट्याशा बिळात शिरला.




बिळातून तो महालात दाखल झाला. त्याने उंदरालाही आत बोलावलं. पण उंदराने बाहेर थांबणंच पसंत केलं.



हेरॉल्ड महालाकडे बघू लागला. आपण खूपच लहान आहोत, असं त्याला वाटू लागलं.




उंदरापेक्षा लहान असलेल्या प्राण्याकडे राजाने कदाचित लक्ष दिलं नसतं. म्हणून, हेरॉल्डने पुन्हा आपला जांभळा खडू उचलला.




आपण साडेचार पायऱ्यांइतके उंच असू, याची त्याने काळजी घेतली. हीच त्याची खरी उंची होती.




मग तो राजाच्या
शोधात पायऱ्या चढू
लागला.




तो पायऱ्या चढूनचढून एवढा दमला
की आणखी पायऱ्या चढणं त्याला
शक्य होईना.




सुदैवाने, तिथे आणखी पायऱ्या नव्हत्या.
तो सर्वात वरच्या पायरीवर उभा होता.



अजूनही त्याला राजा सापडला नव्हता. मग
त्याला आठवलं, राजे सिंहासनावर बसतात.



राजाचं सिंहासन आरामदायक वाटतं होतं. आपण यावर थोडा वेळ आराम केला तर राजाची हरकत नसेल, असं हेरॉल्डला वाटलं.




मग हेरॉल्ड सिंहासनावर बसला. मी थोडा वेळ राजाचा मुकुट घातला, तर कसं वाटेल, असं त्याच्या मनात आलं.




मग त्याने राजाचा मुकुट डोक्यावर चढवला.



काही वेळ त्याला बरं वाटलं. पण मग
हेरॉल्डला मुकुटाचं वजन जाणवू लागलं.




म्हणून हेरॉल्डने मुकुट
राजाच्या डोक्यावर चढवला.



मुकुट घालायला दिला म्हणून हेरॉल्डने राजाचे
आभार मानले. हेरॉल्डला राजा खूप उदास
वाटला. कदाचित ओसाड बागेमुळे असावं.



त्याच्या चिंतेचं कारण चेटकीण किंवा राक्षस आहे का, असं हेरॉल्डने राजाला विचारलं. राजाला नेमकं कारण माहीत नव्हतं. तो दुःखी आणि असहाय दिसत होता.




चेटकीण की राक्षस यांपैकी कोणीतरी एक नक्की होतं आणि ते अदृश्य होतं. पण हेरॉल्डने राजाला चिंता न करण्यास सांगितलं.




तो अदृश्य चेटकीण की राक्षस शोधण्यास निघाला. त्यासाठी त्याने आपल्या जांभळ्या खडूचा वापर केला. चुकून त्याने भिंतीत एक भोक बनवलं.




हेरॉल्डला पेच पडला. पण हे भोक महालाबाहेर बाहेर पडण्याचा सर्वात सोपा मार्ग होता. हेरॉल्ड त्यातून बाहेर पडला.




त्याने भोकाच्या दुसऱ्या बाजूला बघितलं तेव्हा
आपण किती उंचावर आहोत, हे त्याला कळलं.




खाली उतरण्यासाठी त्याला उंच
काहीतरी हवं होतं, एखाद्या
मनोऱ्यासारखं.






महालाच्या भिंतीवरचं भोकं बुझवण्यासाठी हेरॉल्डने त्यात एख छानसं घड्याळ बसवलं. त्यातील वेळ बघून त्याला आश्चर्य वाटलं. त्याला खूप उशीर झाला होता.


अदृश्य चेटकीण की राक्षस शोधण्यासाठी तो मनोऱ्यावरून घसरत खाली उतरला.



पण तो मनोरा नव्हता. ती एक टोकदार टोपी होती.



खरंतर, ती एक विशाल चेटकीण होती.



जांभळ्या खडूमुळे सारं चित्र स्पष्ट झालं. ती एक अदृश्य विशाल चेटकीण होती. साहजिक आहे, तिच्यामुळे सुंदर बागेत काहीच उगवत नव्हतं.




बागेतील माती विशाल चेटकीण आपल्या भारी पायांनी तुडवत असेल तर बागेत काही उगवणारच नाही, हेरॉल्डच्या मनात आलं.



हेरॉल्डला समस्या लक्षात आली. त्या चेटकिणीला सुंदर बागेतून हाकलून द्यायला हवं होतं.


मच्छर. मच्छर कुणालाही बागेतून सहजपणे पळवून लावू शकतात.





मच्छरांनी चेटकिणीला बागेतून पळवून लावलं. ते हेरॉल्डलाही बागेतून पळवून लावू लागले.

मच्छरांपासून वाचण्यासाठी हेरॉल्डने धूर तयार केला.




मग त्याला, जिथे धूर असतो तिथे
आग असते, ही गोष्ट आठवली.




आग विझवण्यासाठी त्याने आधी अग्निशमन बंब
काढायचा विचार केला. पण मग त्याने पाऊस काढला.
ते जास्त सोपं होतं.






पावसात सगळं ओलं ओलं झालं,
हेरॉल्डसुद्धा. पण फुलांसाठी हा पाऊस
वरदान ठरला.

हेरॉल्डचा अंदाज खरा ठरला. लवकरच बागेत
फुलंच फुलं दिसू लागली.




बागेत सर्वत्र सुंदर आणि रंगीबेरंगी फुलं दिसू लागली. हेरॉल्डला मोजता येणार नाहीत, एवढी त्यांची संख्या होती.

राजा सकाळी महालाबाहेर येईल तेव्हा एवढी सगळी फुलं बघून नक्कीच खुश होईल, असं हेरॉल्डला वाटलं.




आश्चर्याचा गोष्ट म्हणजे, शेवटचं फूल, हे फूल नसून एक सुंदर परी होती.




त्या परीने हेरॉल्डला पाहून आपली जादूची काठी हलवली. तिने हेरॉल्डच्या सर्व इच्छा पूर्ण होतील, असं वरदान दिलं.




त्यावेळी हेरॉल्डच्या मनात कसलीही इच्छा नव्हती. पण त्याने विनम्रपणे एक इच्छा व्यक्त केली आणि परीला म्हटलं की तिने दिलेल्या वरदानाचा उपयोग तो नंतर कधीतरी करेल.



घरी जाताना हेरॉल्डने विचार केला की तो वर कधीतरी नक्कीच त्याच्या कामी येईल.




एवढं सगळं झाल्यावर त्याला अचानक थकवा जाणवू लागला. तो थोडा वेळ विश्रांतीसाठी थांबला.



तो एका छोट्याशा गालिचावर बसला, कारण जमीन अजूनही ओली होती. मग त्याने आपली इच्छा व्यक्त केली -





त्याने गालिचा उडावा अशी इच्छा व्यक्त केली. त्याचक्षणी, गालिचा हवेत उचलला गेला असल्याचं त्याला जाणवलं.

गालिचा वेगाने उंच उडू लागला.









गालिचा इतक्या वेगाने उडू लागला की
लवकरच त्याने चंद्राला मागे टाकलं.
गालिचाचा वेग कसा कमी करावा आणि
त्याला कसं थांबवावं, हे हेरॉल्डला कळेना.


आपण परीकडून दोन वर घ्यायला हवे
होते, असं त्याला आता वाटू लागलं.
दुसऱ्या वराने तो गालिचाला खाली
उतरवू शकला असता.



पण हेरॉल्डकडे अजूनही त्याचा
जांभळा खडू होता.



त्याने उडत्या गालिचाला थेट आपल्या घरी
उतरवलं. बाजुलाच एका उंच खुर्चीवर त्याची
आई विणकाम करत होती.



पलंगावर झोपी जाण्याआधी हेरॉल्डने
आईला गोष्ट वाचून दाखवण्यास
सांगितलं.

समाप्त